प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

मार्च 5, 2018

**ॲक्सिस बँक लि. ह्यांचेवर आरबीआयकडून आर्थिक दंड लागु**

फेब्रुवारी 27, 2018 रोजी भारतीय रिझर्व बँकेने (आरबीआय) ॲक्सिस बँक लि. (ती बँक) ह्यांचेवर इनकम रेकग्निशन अँड ॲसेट क्लासिफिकेशन (आयआरएसी) नॉर्म्स बाबत आरबीआयने दिलेल्या सूचनांचे पालन न केल्याबद्दल रु.30 दशलक्ष दंड लागु केला आहे. आरबीआयने वर दिलेल्या सूचना/मार्गदर्शक तत्वे ह्यांचे वरील बँकेने पालन न केल्याने बँकिंग विनियम अधिनियम 1949 च्या कलम 46(4)(1) सह वाचित, कलम 47अ(1)(क) खाली तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, आरबीआयने हा दंड लागु केला आहे.

ही कारवाई विनियमात्मक अनुपालनातील त्रुटींवर आधारित असून, वरील बँकेने तिच्या ग्राहकांबरोबर केलेल्या व्यवहारांच्या/करारांच्या वैधतेशी संबंधित नाही.

**पार्श्वभूमी**

मार्च 31, 2016 रोजीच्या वित्तीय स्थितीसंबंधाने वरील बँकेच्या वैधानिक तपासणीत, इतर बाबींबरोबर आढळून आले की, अकार्यकारी ॲसेट्सच्या (एनपीए) मूल्यमापनांबाबत आरबीआयने दिलेल्या निरनिराळ्या विनियमांचे उल्लंघन झालेले आहे. तपासणी अहवाल व इतर कागदपत्रे ह्यांच्या आधारे, नोव्हेंबर 16, 2017 दिनांकित एक नोटिस वरील बँकेला पाठविण्यात आली व आरबीआयने दिलेल्या सूचनांचे पालन न केल्याबद्दल तिला दंड का लावण्यात येऊ नये ह्याची कारणे देण्यास सांगण्यात आले होते. ह्यावर वरील बँकेने दिलेले उत्तर व वैय्यक्तिक सुनावणीत दिलेले मौखिक सादरीकरण विचारात घेऊन आरबीआयने निर्णय घेतला की, आरबीआयच्या सूचना/मार्गदर्शक तत्वे ह्यांचे पालन न केले गेल्याबाबतचे वरील आरोप सिध्द होत असून त्यासाठी आर्थिक दंड लावणे आवश्यक आहे.

**जोस जे कत्तूर**
मुख्य महाव्यवस्थापक

**वृत्तपत्र निवेदन : 2017-2018/2354**